# गांधी विद्यालयात सायबर सुरक्षेची जनजागृती



**भंडारा :** जनजागृती कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी.

भंडारा, ता. १५ : क्विक हिल फाऊंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत येथील गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला.

यात जे.एम. पटेल कॉलेजच्या अनुश्री वाहाणे व मिष्टी दास यांनी सायबर सुरक्षेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची गरज अधोरेखित केली. मोबाईलबा वापर करत असताना इंटरनेट व सायबर सुरक्षित व सतर्क राहणे गरजेचे असते हे त्यांनी उदहारणासह पठवून दिले. सायबर वॉरिअर अनुश्री वाहाणे व मिष्टी दास यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती देऊन स्वतःला व परिवाराला कसे सुरक्षित राहावे या बाबत मार्गदर्शन केले.

गांधी विद्यालय व महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांना क्विक हिल फाऊंडेशनतर्फे उत्कृष्ठ मार्गदर्शन मिळाले असे मुख्याध्यापक प्रा. जुवार यांनी सांगितले. यासाठी फाऊंडेशनच्या अनुपमा काटकर व अजय शिर्के यांचे त्यांनी आभार मानले. कार्यकमाचे आयोजन विभाग प्रमुख सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केली होती.